# रिटेल फायनान्स :-

## नविन दुचाकी/चारचाकी वाहन खरेदी

**(३) व्यापारी/उद्योजक यांचेसाठी-**

**कर्जमर्यादा -** एकूण कोटेशनच्या ८०% जास्तीत जास्त रु. २५.०० लाख

**मुदत-** ७ वर्षे (मासिक हप्ता),

**व्याजदर -** १२.५०% (ज्या त्या वेळच्या धोरणानुसार व्याजदर राहील)

**कर्जदार पात्रता -**

१) अर्जदार हा सांगली जिल्हयातील रहिवाशी असणे आवश्यक.

२) अर्जदार व जामिनदार बॅंकेचा ब वर्ग सभासद असणे आवश्यक.

३) अर्जदार व्यावसाईकांना मागील तीन वर्षाच्या आयकर विवरण पत्रकातील उत्पन्नाचे सरासरीच्या ५ पटीचे ७५% इतपत परंतु जास्तीत जास्त रु.२५.०० लाख पर्यंत कर्ज मर्यादा राहील.

४) दोन जामिनदार त्यापैकी एक नोकरदार शासकीय/निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यामधील) व दुसरा व्यावसाईक की जो आयकर विवरण पत्र धारक असावा.

५) अर्जदाराचे किंवा कुटुंबातील व्यक्तींचे नावावरील निर्वेध मालमत्ता (घर/जमिन/जागा) जी कर्जमागणी रक्कमेइतपत असणे आवश्यक.

६) अर्जदाराचे बॅंकेमध्ये किमान ६ महिन्यापेक्षा जादा कालावधीचे बचत ठेव (सेव्हिंग्ज) खाते असले पाहिजे.

**तारण :-**

१) कर्जातून घेतलेली नवीन दुचाकी/चार चाकी वाहन हे बॅंकेस हायपोथिकेशनद्वारे तारण राहील तसेच कर्जदाराचे किंवा कुटुंबातील व्यक्तींचे नावावरील कर्ज मंजूर रक्कमेइतपत मुल्याची निर्वेध मालमत्ता (घर/जमिन/जागा ) रजि.मॉर्गेज डीडने तारण देणे आवश्यक.

२) कर्ज मंजूर मर्यादेमधून ५% रक्कम ठेवीमध्ये गुंतवणूक करणेची असून सदरची ठेव कर्जास सहतारण राहील.